# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४

ईमेल: kvk_ndb@yahoo.com

### १००) जिल्हा: नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३ मार्च, २०२५

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१४/०३/२०२५ ते १८/०३/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ४० | ३९ | ३८ | ३७ | ३७ |
| किमान तापमान (अं.से.) | २४ | २३ | २२ | २१ | २१ |
| ढग स्थिती (आकाश) | निरभ्र | निरभ्र | अंशत: ढगाळ | निरभ्र | अंशत: ढगाळ |
| स. सापेक्ष आर्द्रता (%) | ३८ | ३२ | ३७ | ४० | ४० |
| दु. सापेक्ष आर्द्रता (%) | २१ | २२ | २४ | २५ | २५ |
| हवेचा वेग (किमी/तास) | ५ | ५ | ७ | ६ | ७ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहील. कमाल तापमान ३७ ते ४० अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१ ते २४ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज | | दि. १६ ते २२ मार्च २०२५ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | पिकांवर फवारणी वारा शांत असताना करावी. सर्व पिके वेळेवर आंतरमशागत करून तणविरहीत ठेवावीत. पिकांवर किडीचा आणि रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये वेळेवर पीक संरक्षण करावे. |
| संदेश | | पुढील पाच दिवस जिल्ह्यात हवामान कोरडे राहुण्याची शक्यता आहे. |
| भुईमुग | वाढीची अवस्था | आंतर मशागत: भुईमुगाचे पीक ४५ दिवसापर्यंत तणविरहीत ठेवण्यासाठी २ खुरपण्या १५-२० दिवसांच्या अंतराने व दोन कोळपण्या १०-१२ दिवसांच्या अंतराने देणे गरजेचे आहे. ३५-४० दिवसानंतर आ-या सुटु लागल्यानंतर कोणतेही आंतर मशागतीचे काम करु नये फक्त मोठे तण उपटून टाकावे म्हणजे शेंगा पोसण्याचे प्रमाण वाढेल. |
| उन्हाळी मुग | पेरणी | बियाणे आणि पेरणी: उन्हाळी मुग पेरणी मार्च महिन्याच्या पहिल्या पंधरवाडया पर्यंत करावी. बी पेरणीपुर्वी पाण्यामध्ये भिजवावे. त्यामुळे उगवणक्षमता वाढते. रायझोबियम जिवाणुसेवर्धक २५० ग्रॅम १० किलो बियाण्यास चोळावे. दोन ओळीतील अंतर ३० सेंमी असावे. पेरणीपुर्व जमीन ओली करुन घ्यावी व वाफसा आल्यावर पेरणी करावी. प्रती हेक्टरी १५ ते २० किलो वापरावे. |
| हरभरा | काढणी | हरभरा पिक परिपक्व झाला असल्यास काढणी व मळणी करून घ्यावी. हरभरा उन्हात६-७ दिवस वाळवून कोरड्या व हवेशीर जागी साठवणूक करावी. पीक ओलसर असताना काढणी करु नये. |
| गहू | वाढीची ते पक्वता अवस्था | पीक तयार होताच वेळेवर कापणी करावी. कापणीच्यावेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे. गव्हाची मळणी, यंत्राच्या सहाय्याने करावी किंवा गव्हाची कापणी व मळणी कंबाईन हार्वेस्टर मशीनने करावी. |
| केळी | लागवड | फेब्रुवारी महिन्यात लागवड केलेल्या केळीसाठी लागवडी नंतर ३० दिवसांचे आत युरिया ८२ ग्रॅम/झाड, सिंगल सुपर फॉस्फेट ३७५ ग्रॅम/झाड, म्युरेट ऑफ पोटॅश ८३ ग्रॅम/झाड जमिनीतून द्यावे. |
| पपई | लागवड | जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात लागवड केलेल्या पपईसाठीउन्हाळ्यात आठवड्यातुन एकदा पाणी द्यावे. आंतरमशागत करून बाग स्वच्छ ठेवावी. |
| आंबा | फळ येण्याची अवस्था | तापमानात वाढ होऊन आर्द्रतेत घटझाल्याने, अशा वातावरणात फळधारणा झालेल्या आंबा बागेमधील वाटाणा ते सुपारी आकाराच्या फळांची गळ होण्याची शक्यता असते. ही फळगळ कमी करण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार आठवड्याच्या अंतराने फळे सुपारीच्या |

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

| | | |
|---|---|---|
| | | आकाराच्या अवस्थेपर्यंत द्यावे. |
| **चारा पिके** | **लागवड** | संकरित नेपियर गवत लागवड मार्च महिन्यापर्यंत करावी. लागवडीसाठी कसदार, मध्यम ते भारी, चांगली निचरा होणारीजमीन निवडावी तसेच सुधारित वाण फुले जयवंत (आर.बी.एन. १३), फुले गुणवंत (आर.बी.एन. २०११-१२) वापर करावा. ९०×६० सें.मी. अंतरावर लागवड करावी. |
| **पशुसंवर्धन** | **-** | तापमान वाढत असल्याने उन्हापासून जनावरांचे संरक्षण करावे. हिरवा चारा देण्याची व्यवस्था करावी आणि पिण्यास थंड पाणी द्यावे. |

**स्त्रोत**

**१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.**

**ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**
**दि. : १३/०३/२०२५**

**स्वाक्षरीत**
**प्रमुखअन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**